
# श्री गुरुचरित्र अध्याय-१४



www.anipdf.com

श्री गणेशाय नमः ।श्रीसरस्वत्यै नमः ।श्रीगुरुभ्यो नमः ।

नामधारक शिष्य देखा ।विनवी सिद्धासी कवतुका ।
प्रश्न करी अतिविशेखा ।एकचित्ते परियेसा ॥१ ॥

जय जया योगीश्वरा ।सिद्धमूर्ति ज्ञानसागरा ।
पुढील चरित्र विस्तारा ।ज्ञान होय आम्हांसी ॥२ ॥

उदरव्यथेच्या ब्राह्मणासी ।प्रसन्न जाहले कृपेसी ।
पुढे कथा वर्तली कैसी ।विस्तारावे आम्हांप्रति ॥३ ॥

ऐकोनि शिष्याचे वचन ।संतोष करी सिद्ध आपण ।
गुरुचरित्र कामधेनु जाण ।सांगता जाहला विस्तारे ॥४ ॥

ऐक शिष्या शिखामणि ।भिक्षा केली ज्याचे भुवनी ।
तयावरी संतोषोनि ।प्रसन्न जाहले परियेसा ॥५ ॥

गुरुभक्तीचा प्रकारु ।पूर्ण जाणे तो द्विजवरू ।
पूजा केली विचित्रु ।म्हणोनि आनंद परियेसा ॥६ ॥

तया सायंदेव द्विजासी ।श्रीगुरू बोलती संतोषी ।
भक्त हो रे वंशोवंशी ।माझी प्रीति तुजवरी ॥७ ॥

ऐकोनि श्रीगुरुचे वचन ।सायंदेव विप्र करी नमन ।
माथा ठेवून चरणी ।न्यासिता झाला पुनःपुन्हा ॥८ ॥

www.anipdf.com

जय जया जगद्गुरू । त्रयमूर्तींचा अवतारू ।
अविद्यामाया दिससी नरु । वेदां अगोचर तुझी महिमा ॥ ९ ॥

विश्वव्यापक तूंचि होसी । ब्रह्मा-विष्णु-व्योमकेशी ।
धरिला वेष तूं मानुषी । भक्तजन तारावया ॥ १० ॥

तुझी महिमा वर्णावयासी । शक्ति कैंची आम्हांसी ।
मागेन एक आता तुम्हांसी । तें कृपा करणे गुरुमूर्ति ॥ ११ ॥

माझे वंशपारंपरी । भक्ति द्यावी निर्धारी ।
इहे सौख्य पुत्रपौत्री । उपरी द्यावी सद्गति ॥ १२ ॥

ऐसी विनंति करुनी । पुनरपि विनवी करुणावचनी ।
सेवा करितो द्वारयवनी । महाशूरक्रुर असे ॥ १३ ॥

प्रतिसंवत्सरी ब्राह्मणासी । घात करितो जीवेसी ।
याचि कारणे आम्हांसी । बोलावीतसे मज आजि ॥ १४ ॥

जातां तया जवळी आपण । निश्चये घेईल माझा प्राण ।
भेटी जाहली तुमचे चरण । मरण कैचे आपणासी ॥ १५ ॥

संतोषोनि श्रीगुरूमूर्ति । अभयंकर आपुले हाती ।
विप्रमस्तकी ठेविती । चिंता न करी म्हणोनिया ॥ १६ ॥

www.anipdf.com

भय सांडूनि तुवां जावे ।क्रुर यवना भेटावे ।
संतोषोनि प्रियभावे ।पुनरपि पाठवील आम्हांपाशी ॥ १७ ॥

जंववरी तू परतोनि येसी ।असो आम्ही भरंवसी ।
तुवां आलिया संतोषी ।जाऊ आम्हीं येथोनि ॥ १८ ॥

निजभक्त आमुचा तू होसी ।पारंपर-वंशोवंशी ।
अखिलाभीष्ट तू पावसी ।वाढेल संतति तुझी बहुत ॥ १९ ॥

तुझे वंशपारंपरी ।सुखे नांदती पुत्रपौत्री ।
अखंड लक्ष्मी तयां घरी ।निरोगी होती शतायुषी ॥ २० ॥

ऐसा वर लाधोन ।निघे सायंदेव ब्राह्मण ।
जेथे होता तो यवन ।गेला त्वरित तयाजवळी ॥ २१ ॥

कालांतक यम जैसा ।यवन दुष्ट परियेसा ।
ब्राह्मणाते पाहतां कैसा ।ज्वालारूप होता जाहला ॥ २२ ॥

विमुख होऊनि गृहांत ।गेला यवन कोपत ।
विप्र जाहला भयचकित ।मनीं श्रीगुरूसी ध्यातसे ॥ २३ ॥

कोप आलिया ओळंबयासी ।केवी स्पर्शे अग्नीसी ।
श्रीगुरूकृपा होय ज्यासी ।काय करील क्रुर दुष्ट ॥ २४ ॥

www.anipdf.com

गरुडाचिया पिलीयांसी । सर्प तो कवणेपरी ग्रासी ।
तैसे तया ब्राह्मणासी । असे कृपा श्रीगुरुची ॥ २५ ॥

कां एखादे सिंहासी । ऐरावत केवीं ग्रासी ।
श्रीगुरुकृपा होय ज्यासी । कलिकाळाचे भय नाही ॥ २६ ॥

ज्याचे हृदयीं श्रीगुरुस्मरण । त्यासी कैंचे भय दारुण ।
काळमृत्यु न बाधे जाण । अपमृत्यु काय करी ॥ २७ ॥

ज्यासि नांही मृत्यूचे भय । त्यासी यवन असे तो काय ।
श्रीगुरुकृपा ज्यासी होय । यमाचे मुख्य भय नाही ॥ २८ ॥

ऐसेपरी तो यवन । अन्तःपुरांत जाऊन ।
सुषुप्ति केली भ्रमित होऊन । शरीरस्मरण त्यासी नाही ॥ २९ ॥

हृदयज्वाळा होय त्यासी । जागृत होवोनि परियेसी ।
प्राणांतक व्यथेसी । कष्टतसे तये वेळी ॥ ३० ॥

स्मरण असे नसे कांही । म्हणे शस्त्रे मारितो घाई ।
छेदन करितो अवेव पाही । विप्र एक आपणासी ॥ ३१ ॥

स्मरण जाहले तये वेळी । धांवत गेला ब्राह्मणाजवळी ।
लोळतसे चरणकमळी । म्हणे स्वामी तूंचि माझा ॥ ३२ ॥

www.anipdf.com

येथे पाचारिले कवणी । जावे त्वरित परतोनि ।
वस्त्रे भूषणे देवोनि । निरोप दे तो तये वेळी ॥ ३३ ॥

संतोषोनि द्विजवर । आला ग्रामा वेगवत्र ।
गंगातीरी असे वासर । श्रीगुरुचे चरणदर्शना ॥ ३४ ॥

देखोनिया श्रीगुरूसी । नमन करी तो भावेसी ।
स्तोत्र करी बहुवसी । सांगे वृत्तांत आद्यंत ॥ ३५ ॥

संतोषोनि श्रीगुरूमूर्ति । तया द्विजा आश्वासिती ।
दक्षिण देशा जाऊ म्हणती । स्थान-स्थान तीर्थयात्रे ॥ ३६ ॥

ऐकोनि श्रीगुरुंचे वचन । विनवीतसे कर जोडून ।
न विसंबे आतां तुमचे चरण । आपण येईन समागमे ॥ ३७ ॥

तुमचे चरणाविणे देखा । राहो न शके क्षण एका ।
संसारसागर तारका । तूंचि देखा कृपासिंधु ॥ ३८ ॥

उद्धरावया सगरांसी । गंगा आणिली भूमीसी ।
तैसे स्वामी आम्हासी । दर्शन दिधले आपुले ॥ ३९ ॥

भक्तवत्सल तुझी ख्याति । आम्हा सोडणे काय नीति ।
सवे येऊ निश्चिती । म्हणोनि चरणी लागला ॥ ४० ॥

www.anipdf.com

येणेपरी श्रीगुरूसी । विनवी विप्र भावेसी ।
संतोषोनि विनयेसी । श्रीगुरू म्हणती तये वेळी ॥ ४१ ॥

कारण असे आम्हा जाणे । तीर्थे असती दक्षिणे ।
पुनरपि तुम्हां दर्शन देणे । संवत्सरी पंचदशी ॥ ४२ ॥

आम्ही तुमचे गांवासमीपत । वास करू हे निश्चित ।
कलत्र पुत्र इष्ट भ्रात । मिळोनी भेटा तुम्ही आम्हां ॥ ४३ ॥

न करा चिंता असाल सुखे । सकळ अरिष्टे गेली दुःखे ।
म्हणोनि हस्त ठेविती मस्तके । भाक देती तये वेळी ॥ ४४ ॥

ऐसेपरी संतोषोनि । श्रीगुरू निघाले तेथोनि ।
जेथे असे आरोग्यभवानी । वैजनाथ महाक्षेत्र ॥ ४५ ॥

समस्त शिष्यांसमवेत । श्रीगुरू आले तीर्थे पहात ।
प्रख्यात असे वैजनाथ । तेथे राहिले गुप्तरूपे ॥ ४६ ॥

नामधारक विनवी सिद्धासी । काय कारण गुप्त व्हावयासी ।
होते शिष्य बहुवसी । त्यांसी कोठे ठेविले ॥ ४७ ॥

गंगाधराचा नंदनु । सांगे गुरुचरित्र कामधेनु ।
सिद्धमुनि विस्तारून । सांगे नामकरणीस ॥ ४८ ॥

www.anipdf.com

पुढील कथेचा विस्तारू । सांगता विचित्र अपारु ।
मन करूनि एकाग्रु । ऐका श्रोते सकळिक हो ॥ ४९ ॥

इति श्रीगुरुचरित्रामृते परमकथाकल्पतरौ
श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्धनामधारकसंवादे -
सायंदेववरप्रदानं नाम चतुर्दशोऽध्यायः ॥१४॥-क्रूरयवनशासनं

॥ श्रीगुरुदेव दत्त ॥

॥ ओंवीसंख्या ४९ ॥

॥श्रीगुरुदत्तात्रेयार्पणमस्तु॥

www.anipdf.com